**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी योजना ग्रामीण विधेयक लोकसभेत सादर, सव्वाशे दिवसांच्या रोजगार हमीची तरतूद

- येत्या ५ वर्षात जॉर्डनबरोबरचा द्विपक्षीय व्यापार ५ अब्ज डॉलर करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं उद्दिष्ट, जॉर्डन दौरा आटोपून प्रधानमंत्री इथियोपियात दाखल

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते राहुल आणि सोनिया गांधी यांच्याविरूद्ध दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घ्यायला दिल्लीतल्या न्यायालयाचा नकार

- फुटबॉलपटू मेस्सीच्या दौऱ्यात झालेल्या गोंधळ प्रकरणी पश्चिम बंगालचे क्रीडा मंत्री अरुप बिश्वास यांचा राजीनामा

**आणि**

- १९ वर्षाखालच्या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतल्या सामन्यात भारताचा मलेशियावर ३१५ धावांनी विजय

**<><><><><>**

विकसित भारत- रोजगार आणि आजीविका हमी योजना (ग्रामीण) विधेयक, २०२५ अर्थात विकसित भारत - जी राम जी विधेयक आज लोकसभेत मांडण्यात आलं. हे विधेयक २० वर्षांपासून चालत आलेल्या, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा, २००५ अर्थात 'मनरेगा'ची जागा घेईल. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड कॅप्सूल (२ मिनिट)**

*(विद्यमान मनरेगात १०० दिवसांच्या रोजगाराची हमी दिली आहे. प्रस्तावित विधेयकात सव्वाशे दिवसांच्या कामाची हमी प्रस्तावित आहे. पेरणी किंवा कापणीच्या हंगामात एकंदर*

*६० दिवसांचा कालावधी अधिसूचित करायचा अधिकार राज्यांना दिला आहे. यादरम्यान मनरेगाचं काम थांबवलं जाईल, जेणेकरून शेतीतल्या कामांना मजुरांची कमतरता भासणार नाही. पूर्वी या योजनेचा संपूर्ण निधी केंद्र सरकार द्यायचं. आता मोठ्या राज्यात ६० टक्के निधी केंद्राचा आणि उर्वरित ४० टक्के वाटा हा राज्यांचा असेल. ईशान्येकडची आणि हिमालयातल्या राज्यांमध्ये केंद्राचा वाटा ९० टक्क्यांपर्यंत वाढेल. याविषयी कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले…*

***होल्ड… बाईट- शिवराज सिंह चौहान***

*या मूळ योजनेतून महात्मा गांधींचं नाव काढून टाकल्याचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेस, द्रमुक आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू केली आणि हे विधेयक मागे घ्यायची मागणी केली. याविषयी खासदार प्रियंका गांधी म्हणाल्या…*

***होल्ड… बाईट- प्रियांका गांधी***

*विरोधकांचा गोंधळ सुरू राहिल्यानं सभापतींनी काहीकाळ कामकाज तहकूब केलं होतं.)*

**<><><><><>**

विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक, २०२५, संयुक्त संसदीय समितीकडे पाठवायचा प्रस्ताव लोकसभेनं मंजूर केला. या विधेयकामुळं शैक्षणिक संस्थांची स्वायत्तता, मानांकन, दर्जा, संशोधन यासारख्या गोष्टी मजबूत होतील. तसंच विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियांच्या आधारे शैक्षणिक संस्थांचं मानांकन ठरवलं जाईल, असं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले. या संस्थांच्या निर्णय प्रक्रियेत उद्योगांचाही सहभाग असेल, अशी माहिती त्यांनी दिली. कायदा रद्द करणं आणि दुरुस्ती विधेयकही लोकसभेनं मंजूर केलं.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सबका बिमा, सबकी रक्षा, विमा कायदे सुधारणा विधेयक २०२५ लोकसभेत मांडलं. यामुळं वीमा कंपन्यांमधली थेट परदेशी गुंतवणूक वाढेल, नियमन अधिक चांगलं होईल, कामकाजात पारदर्शकता वाढेल असं त्या म्हणाल्या. द्रमुक आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांनी या

विधेयकातल्या, परदेशी गुंतवणूक १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावाला विरोध केला.

<><><><><>

राज्यसभेनं आज पुरवणी मागण्यांवर चर्चा पूर्ण केली, तसंच निवडणूक सुधारणांवरच्या चर्चेचाही सभागृहात समारोप झाला. कोणताही पात्र मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, आणि कोणत्याही अपात्र मतदाराचा समावेश याद्यांमध्ये असू नये, असं भारताची राज्यघटना सांगते, असं प्रतिपादन सभागृह नेते जे. पी. नड्डा यांनी या चर्चेदरम्यान केलं. विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रिया राबवणं हे निवडणूक आयोगाच्या अधिकारक्षेत्रात येतं, याचा पुनरुच्चार त्यांनी केला आणि निवडणूक आयोगाच्या कामाचं कौतुक केलं.

मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा उद्देश हा फूट पाडणं, महत्त्वाच्या मुद्द्यांपासून लक्ष विचलित करणं हा असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसचे डेरेक ऑब्रायन यांनी केला.

<><><><><>

येत्या ५ वर्षात जॉर्डनबरोबरचा द्विपक्षीय व्यापार ५ अब्ज डॉलर करण्याचं उद्दिष्ट प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ठेवलं आहे. सध्या हा व्यापार सुमारे सव्वा २ अब्ज डॉलर आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी राजे अब्दुल्ला द्वितीय यांच्याशी जॉर्डनची राजधानी अम्मान इथं द्विपक्षीय चर्चा केली. तसंच उद्योजकांचीही भेट घेतली.

**होल्ड - प्रधानमंत्री**

या दौऱ्यात एकूण ५ सामंजस्य करार झाले. त्यात पेट्रा आणि वेरुळ यांच्यात सांस्कृतिक देवाणघेवाण, पर्यटन विकासाच्या संदर्भातल्या कराराचा समावेश आहे. याशिवाय नवीकरणीय ऊर्जा, जलसंपदा या क्षेत्रातल्या करारांचा समावेश आहे.

जॉर्डनचा दौरा आटोपून संध्याकाळी प्रधानमंत्री इथियोपियाला पोचले. आदिस अबाबा विमानतळावर इथिओपियाचे प्रधानमंत्री डॉक्टर अबीय अहमद

अली यांनी त्यांचं स्वागत केलं. इथिओपियानंतर प्रधानमंत्री ओमानला भेट देणार आहेत.

<><><><>

नॅशनल हेराल्ड प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी, सोनिया गांधी आणि इतर पाच जणांविरुद्ध ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घ्यायला दिल्लीच्या एका न्यायालयानं आज नकार दिला. राऊज ॲव्हेन्यू न्यायालयातले विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी हा निर्णय दिला. मात्र, कायद्याला धरून तपास सुरू ठेवायचा हक्क ईडीला आहे, असंही त्यांनी सांगितलं. आरोपपत्राची दखल घ्यायला नकार देण्याच्या या निर्णयाविरोधात अर्ज दाखल करणार असल्याचं ईडीनं म्हटलं आहे.

<><><><>

मथुरा इथं यमुना द्रुतगती महामार्गावर आज पहाटे झालेल्या अपघातात १३ जण ठार झाले, तर ७०पेक्षा जास्त जण जखमी झाले. दाट धुक्यामुळे किमान सात बस आणि अनेक छोट्या गाड्या एकमेकांना धडकल्या. या अपघाताबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे. प्रधानमंत्र्यांनी मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली.

<><><><>

पश्चिम बंगालचे क्रीडा मंत्री म्हणून अरुप बिश्वास यांनी दिलेला राजीनामा मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी स्वीकारला आहे. हे खातं आता ममता बॅनर्जी यांच्याकडे असेल. बिश्वास हे ऊर्जा मंत्री म्हणून मंत्रीमंडळात कायम राहतील. प्रसिद्ध फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याच्या उपस्थितीतल्या कार्यक्रमात झालेल्या गैरव्यवस्थापनामुळं क्री़डामंत्री  बिस्वास यांनी राजीनामा दिला आहे.

याप्रकरणी पश्चिम बंगाल सरकारनं पोलिस महासंचालक आणि सॉल्ट लेक स्टेडियमचे मुख्य कार्यकारी अधिकारी या दोघांना कारणे दाखवा नोटीस बजावली. तसंच बिधाननगरचे पोलिस उपायुक्त अनीश सरकार यांना निलंबित केलं.

<><><><><>

गोवा नाईट क्लब आग प्रकरणी या क्लबचे मालक लुथरा बंधूंना आज थायलंडमधून भारतात परत आणण्यात आलं. दिल्ली विमानतळावरून त्यांना गोवा पोलिसांनी ताब्यात घेतलं.

<><><><><>

ऑस्ट्रेलियात सिडनी इथं बाँडाय बीचवर हल्ला करणाऱ्या दोन हल्लेखोरांपैकी एक, ५० वर्षांचा साजिद अक्रम हा भारताचा नागरिक असून तो हैदराबादचा रहिवासी असल्याची माहिती तेलंगण पोलिसांनी दिली आहे. पोलिसांच्या गोळीबारात तो ठार झाला होता. २७ वर्षांपूर्वी त्यानं ऑस्ट्रेलियाला स्थलांतर केलं असलं, तरी त्याच्याकडे भारताचं पारपत्र होतं, असं तेलंगणच्या पोलीस महासंचालकांच्या कार्यालयानं निवेदनात म्हटलं आहे.

//<><><><><>//